महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : ५८ वे दिनांक : १८/०२/२०२६ वार : बुधवार

## राहुल गांधींविरुद्ध मानहानीचा खटला रद्द : भाजप नेत्याची याचिका फेटाळली



**बंगळूरु** : कर्नाटक उच्च न्यायालयाने मंगळवारी काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्याविरुद्धचा मानहानीचा खटला रद्द केला. हा खटला २०२३ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी '४०% कमिशन'च्या काँग्रेसच्या जाहिरातींबाबत भाजप नेत्याच्या तक्रारीवरून दाखल करण्यात आला होता. 'करप्शन रेट कार्ड' असलेल्या या जाहिरातीला राहुल गांधी यांनीही सोशल मीडियावर शेअर केले होते.

यानंतर भाजप नेते केशव प्रसाद यांनी राहुल गांधी, मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांच्याविरोधात तक्रार दाखल केली होती. त्यांचा आरोप होता की, काँग्रेसने निवडणूक प्रचारादरम्यान जाहिरातींमध्ये तत्कालीन मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांच्यासह भाजप नेत्यांवर सरकारी कंत्राटातून ४०% कमिशन घेतल्याचा खोटा आरोप केला.

या प्रकरणी कर्नाटकच्या न्यायालयाने २३ फेब्रुवारी २०२४ रोजी सिद्धरामय्या, डी.के. शिवकुमार आणि राहुल गांधी यांना समन्स बजावले होते. मॅजिस्ट्रेट कोर्टाने १ जून २०२४ रोजी सिद्धरामय्या, शिवकुमार यांना आणि ७ जून २०२४ रोजी राहुल यांना जामीन मंजूर केला होता. मात्र, राहुल गांधी यांनी समन्सला उच्च न्यायालयातही आव्हान दिले होते.

उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सुनील दत्त यादव यांच्या एकल खंडपीठाने आदेश पारित करताना म्हटले की, राहुल गांधींची याचिका मंजूर करण्यात येत आहे. न्यायालयाने म्हटले की, या प्रकरणाची कार्यवाही पुढे नेणे कायद्याच्या प्रक्रियेचा गैरवापर ठरेल.

कर्नाटक विधानसभा निवडणूक २०२३ दरम्यान काँग्रेसने आपल्या प्रचार मोहिमेत तत्कालीन मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांच्या फोटोसह 'PayCM' लिहिलेले पोस्टर लावले होते. यात QR कोड समाविष्ट होता, जो स्कॅन केल्यावर '४० टक्के सरकार' असलेली वेबसाइट उघडत होती. काँग्रेसचा दावा होता की, भाजपच्या राजवटीत ४० टक्के कमिशन घेतले जात होते. काँग्रेसने दावा केला होता की भाजप सरकारने ४०% कमिशन दर एक मॉडेल बनवले होते. भाजपच्या कायदेशीर विभागाचे वकील विनोद कुमार यांनीही या मोहिमेसंदर्भात काँग्रेस नेत्यांविरोधात तक्रार दाखल केली होती.

या प्रकरणी न्यायालयाने काँग्रेस नेत्यांना २८ मार्च २०२४ रोजी खासदार/आमदार न्यायालयात हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. तर कर्नाटक उच्च न्यायालयाने राज्य सरकारला '४० टक्के कमिशन'च्या आरोपांची चौकशी ६ आठवड्यांच्या आत पूर्ण करण्याचे आदेशही दिले होते.

## निवडणूक आयोग तुघलकी आयोग बनला - ममता बॅनर्जी



**कोलकाता** : पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी निवडणूक आयोगावर तीव्र हल्ला चढवला आहे. कोलकाता येथे पत्रकारांशी बोलताना त्यांनी आयोगाला 'तुघलकी आयोग' असे संबोधले आणि भाजपच्या निर्देशानुसार मतदार यादीतून लाखो नावे हटवली जात असल्याचा आरोप केला.

ममता बॅनर्जी यांनी दावा केला की, भाजप आयटी सेलच्या एका महिला पदाधिकाऱ्याने आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) चा वापर करून ५८ लाख मतदारांची नावे हटवली. त्यांनी याला सुनियोजित कट असल्याचे म्हटले.

त्या म्हणाल्या की, विशेष पुनरीक्षण (SIR) च्या नावाखाली मतदारांना लक्ष्य केले जात आहे. मुख्यमंत्रींनी आरोप केला की, निवडणूक आयोग सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांकडे दुर्लक्ष करत आहे.

त्या म्हणाल्या, "आयोग लोकशाही कमकुवत करत आहे आणि मतदारांना लक्ष्य करत आहे." ममता बॅनर्जी यांनी असाही दावा केला की, बंगालमध्ये SIR संबंधित चिंता आणि कामाच्या ठिकाणच्या दबावामुळे १६० लोकांचा मृत्यू झाला आहे. मात्र, या दाव्यावर निवडणूक आयोगाकडून कोणतीही अधिकृत पुष्टी झालेली नाही.

यापूर्वी ३ फेब्रुवारी रोजी ममता बॅनर्जी यांनी दिल्लीत निवडणूक आयोगाविरोधात एक पत्रकार परिषद घेतली होती. यात ममता म्हणाल्या होत्या की, जर निवडणूक आयोगाने बंगाल सरकारच्या अधिकाऱ्यांविरोधात कारवाई केली, तर राज्य सरकार त्यांना "१०० टक्के सुरक्षा" देईल.

त्या म्हणाल्या की, राज्य प्रशासनाला घाबरवण्याचा प्रयत्न सहन केला जाणार नाही. ममतांनी आयोगावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले की, निवडणुकीच्या अगदी आधी SIR का केले जात आहे? बंगाल, तामिळनाडू, केरळ आणि आसाम या चार राज्यांमध्ये निवडणुका होणार आहेत. SIR तीन राज्यांमध्ये होत आहे, पण भाजपशासित आसाममध्ये नाही. कारण ते 'डबल इंजिन' राज्य आहे.

ममता बॅनर्जी यांनी घुसखोरांवर म्हटले की, हे लोक (भाजप) घुसखोरांची गोष्ट करतात पण ही तर तुमची जबाबदारी आहे. सीमेचे रक्षण करण्याची जबाबदारी केंद्राची आहे. अशा परिस्थितीत घुसखोरीसाठी तेच जबाबदार आहेत.

## पार्थ पवारांना क्लीन चीटच्या बातम्या राजकीय हेतूने पेरलेल्या : अंजली दमानियांचा दावा



**मुंबई** : सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी पार्थ पवार यांना कथित क्लीन चीट मिळाल्याच्या बातम्यांवर प्रतिक्रिया दिली आहे. या बातम्या पूर्णपणे खोट्या असून त्या राजकीय हेतूने माध्यमांमध्ये पेरल्या गेल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. अजित पवार यांच्या निधनानंतर पक्षात निर्माण झालेल्या परिस्थितीचा फायदा घेत काही नेते सूत्रे स्वतःच्या हातात घेण्याच्या प्रयत्नात असल्याचेही त्यांनी म्हटले. या पार्श्वभूमीवर महायुती सरकार आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटावर त्यांनी सडकून टीका केली.

पत्रकार परिषदेत बोलताना दमानिया यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, कोणताही अधिकृत अहवाल अद्याप जाहीर झालेला नसताना क्लीन चीटची बातमी कशी काय प्रसिद्ध होते? खारगे समितीला असा निकाल देण्याचा अधिकारच नाही, असे त्या म्हणाल्या. ही माहिती संबंधित गटाकडूनच जाणीवपूर्वक बाहेर सोडली गेली असावी, असा त्यांचा आरोप आहे. पार्थ पवार यांना राज्यसभेवर पाठवण्यासाठी त्यांची प्रतिमा सुधारण्याची मोहीम राबवली जात असल्याचा दावा त्यांनी केला.

अजित पवारांच्या निधनानंतर निर्माण झालेल्या राजकीय पोकळीवरही दमानिया यांनी भाष्य केले. पक्षात सध्या मोठी घाई सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांच्या मते, उरलेले नेते म्हणजे सुनिल तटकरे, प्रफुल्ल पटेल आणि छगन भुजबळ हे भाजपची बी टीम म्हणून काम करत असून पक्षाची सर्व सूत्रे स्वतःकडे घेण्याचा प्रयत्न करत आहेत. हा संपूर्ण प्रकार नियोजनबद्ध असल्याचा आरोप त्यांनी केला.

दमानिया यांनी प्रशासकीय कारभारावरही प्रश्न उपस्थित केले. ठाणे, नवी मुंबई आणि पनवेल येथे नियमांचे उल्लंघन करून डान्स बार सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. दररोज त्यांना यासंबंधी व्हिडिओ मिळत असल्याचा दावा त्यांनी केला. विशेष म्हणजे मुख्यमंत्र्यांच्या ठाण्यात आणि नाईक यांच्या नवी मुंबईत असे प्रकार जास्त प्रमाणात होत असल्याचे त्यांनी नमूद केले. व्ही आर एस कंपनीवर तातडीने गुन्हा दाखल व्हायला हवा होता, मात्र तसे झाले नाही, असेही त्या म्हणाल्या.

याच वेळी त्यांनी विमान अपघात प्रकरणातील ब्लॅक बॉक्सच्या माहितीकडे लक्ष वेधले. ब्लॅक बॉक्समधील माहिती का पुनर्प्राप्त होत नाही? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला. प्रशासनातील ढिसाळपणा आणि राजकीय हस्तक्षेपामुळेच अहवाल बाहेर येण्यास विलंब होत असल्याची शंका त्यांनी व्यक्त केली.

दमानिया यांनी कुटुंबीय भूमिकेवरही भाष्य केले. सुनेत्रा पवार जर झिरवळ यांच्यावर नाराज असतील, तर त्या पार्थवर का नाहीत? तो मुलगा आहे म्हणून त्याला वाचवले जाते का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. मंत्रालयात प्रत्येक कामासाठी दर ठरलेले असल्याचा आरोप करत त्यांनी विविध ट्रस्टच्या माध्यमातून पैसे घेतले जात असल्याची चौकशी व्हावी, अशी मागणी केली.

मी स्वतः मुख्यमंत्र्यांना संदेश पाठवून या प्रकरणाचा अधिकृत अहवाल मागितला आहे, असे दमानिया यांनी सांगितले. जोपर्यंत अधिकृत कागदपत्र समोर येत नाही, तोपर्यंत अशा बातम्या देणे चुकीचे असल्याचे त्यांनी ठामपणे नमूद केले. राजकीय दबावामुळे अहवाल दडपला जातो, जसे एकनाथ खडसे यांच्या प्रकरणात झाले होते, असा आरोपही त्यांनी केला. या सर्व आरोपांमुळे राज्यातील राजकारण पुन्हा एकदा तापले असून पुढील काही दिवसांत या वादाला आणखी उधाण येण्याची शक्यता आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १८ फेब्रुवारी २०२६


## डॉ. प्रभाकर शेळके यांना विनोदी कथालेखन पुरस्कार



**जालना :** माजी खासदार प्रेमलाताई चव्हाण स्मृती राज्यस्तरीय विनोदी कथालेखन स्पर्धा २०२५ गुंफण अकादमी तर्फे २१ वे गुंफण सद्भावना साहित्य संमेलन पुणे येथे आयोजित करण्यात आले होते.संमेलानाच्या अध्यक्षा ख्यातनाम गझलकार कवयित्री डॉ.सुनंदा शेळके व संयोजक गजानन चेणगे यांच्या शुभहस्ते दुर्गेश प्रभाकर शेळके यांनी हा पुरस्कार स्वीकारला. गुंफण दिवाळी अंकात कंदुरी -एक मुंढी चार पाय या विनोदी कथेला तृतीय सन्मान मिळाला.गुंफण दिवाळी अंकाचे संपादक डॉ बसश्वेर चेणगे, अंकुश पवार, विकास धुळेकर,या मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला डॉ प्रभाकर शेळके यांचे अभिनंदन मसापचे कार्यवाह डॉ दादा गोरे, संपादक प्रा.संतोष तांबे अँड विश्वनाथ गायकवाड पुजा गायकवाड, नारायण देवडे,अनिरुद्ध पावसे प्रल्हाद भोपे, डॉ श्रीनिवास सातभाई, दशरथ बुणगे, भगवान सवळे, सय्यद शफीक विठ्ठल टेपले रामभाऊ शेळकेनामदेव शेळके, देवराव सोनवणे, रमेश नाईक, रंगनाथ खेडेकर, दशरथ बुणगे, तुकाराम पवार, इ. अभिनंदन केले.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## बुन इंग्लिश स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात




**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** शहरातील बुन इंग्लिश स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात अल्मंड फंक्शन हॉल येथे संपन्न झाले यावेळी विद्यार्थ्यांनी विविध कलागुणांचे सादरीकरण,करून उपस्थितीतांचे मन जिंकले कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ज्ञानोपासक महाविद्यालयाचे प्रा. शेख इसाक , प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. जुनेदखान, अहेमद सिद्दीकी सर, नफिस मामू, सिराज सिद्दीकी, शेख रहीम पत्रकार अदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते कार्यक्रमाच्या प्रस्ताविक शाळेचे संस्था अध्यक्ष अहेमद सिद्दीकी यांनी पालकांनी शिक्षणाला प्राधान्य दियावे तसेच बुन इंग्लिश स्कूल येथे दर्जेदार शिक्षण देऊन विद्यार्थीना उच्चशिक्षित करण्यासाठी शाळेतील शिक्षिका व शिक्षक भरपूर परिश्रम घेत असल्यामुळे त्यांनी त्यांचे कौतुक केले शाळेची शैक्षणिक उन्नती व भरारीसाठी परिश्रम घेत असल्यामुळे समाधान व्यक्त केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उकाशा मॅडम यांनी केले, तर आभार प्रदर्शन महेविश सिद्दीकी मॅडम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाहीन मॅडम, शहेबाज सर, तबस्सूम मॅडम, शिजा मॅडम, निलोफर मॅडम, समरीन मॅडम, महेविश मॅडम यांनी परिश्रम घेतले या कार्यक्रमास पालकांनी मोठा सहभाग नोंदविला.

## महिलाच्या आर्थिक सक्षमीकरणाला एआयची जोड मिळाल्यास त्यांचा शाश्वत विकास शक्य - विजया रहाटकर यांचा आशावाद




**नवी दिल्ली : (भगवंत पाळवदे) :** आजच्या वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या युगात आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) हे केवळ एक तांत्रिक साधन नसून शिक्षण, प्रशासन आणि उद्योग क्षेत्राचा केंद्रबिंदू ठरत आहे. आगामी काळात एआयमुळे रोजगाराच्या संधी आणि स्वरूप मोठ्या प्रमाणात बदलणार असून महिलांनी या तंत्राच्या केवळ 'वापरकर्त्या' म्हणून न राहता संशोधक आणि निर्माते होऊन नव्या परिवर्तनाचे नेतृत्व करावे. महिलाच्या आर्थिक सक्षमीकरणाला एआयची जोड मिळाल्यास त्यांचा शाश्वत विकास होउ शकेल असा आशावाद राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी आज येथे व्यक्त केला.दिल्लीतील भारत मंडपम येथे आयोजित 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट'मध्ये आज दुपारी राष्ट्रीय महिला आयोग , आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघटना आणि संयुक्त राष्ट्र प्रशिक्षण व संशोधन संस्था (युनिटार) या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने एआय आणि आर्थिक शक्ती - महिला नेतृत्वातील समृद्धीची रूपरेषा या विषयावर आयोजित विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी समारोपीय भाषणात त्या बोलत होत्या. मंचावर युनिटारच्या संचालिका (समृद्धी विभाग) मिहोको कुमामोटो, आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघाच्या (आयटीयू) प्रादेशिक संचालिका (आशिया-पॅसिफिक) अत्सुको ओकुदा, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह आणि संगीतकार निर्माता कार्तिक शाह उपस्थित होते.या समिटमधील चर्चासत्र हा केवळ संवाद नसून ती एक चळवळ आहे. भारतीय महिलांनी नेहमीच परिवर्तनाचे नेतृत्व केले आहे, असा दाखला देऊन श्रीमती रहाटकर पुढे म्हणाल्या, एआय सारख्या नव्या तंत्रज्ञानातही महिला मागे राहणार नाहीत. त्यासाठी त्यांना अनुरुप प्रक्षिशण व योग्य अशी इको स्टिटीम दिली जाईल. महिलांची केवळ भागीदारी अपेक्षित नसून त्यांच्याकडे या तंत्राची मालकी आली पाहिजे. त्यासाठी महिलांना 'एआय साक्षरता' प्राप्त होणे अत्यावश्यक आहे. यामध्ये डेटा संरक्षण, डिजिटल नीतिमत्ता आणि सायबर सुरक्षेची सखोल समज आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. केवळ घोषणांऐवजी प्रत्यक्ष अंमलबजावणीवर भर देत सूक्ष्म व लघुउद्योगांना जागतिक पुरवठा साखळीशी जोडण्याचे आवाहन करुन राष्ट्रीय महिला आयोग त्यासाठी कृतीशील प्रयत्न करेल, असा विश्वास त्यांनी दिला. या सत्रात श्री. ब्रिजेश सिंह यांनी महिलांना भेडसावणाऱ्या डिजिटल धोक्यांवर प्रकाश टाकला. एआयची निर्मिती प्रामुख्याने पुरुषप्रधान मजकूर आणि डेटाच्या आधारे झाल्याने त्यामध्ये संवेदनशीलता, न्याय आणि समतेचा अभाव दिसून येतो. ही प्रणाली केवळ कार्यक्षमतेच्या 'हायपर-ऑप्टिमायझेशन'वर लक्ष केंद्रित करते, ज्याचा विपरित परिणाम महिलांच्या सुरक्षिततेवर होत आहे. आकडेवारीनुसार, 'डीपफेक' तंत्रज्ञानाच्या ९१ टक्के बळी महिलाच आहेत, जे अत्यंत धक्कादायक आहे. महिलांविरोधात होणारे अत्याचार, डीपफेकसारखे प्रकार यावर निश्चित आणि प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी आपण काही बाबी नक्की करु शकतो. सोशल मीडिया कंपन्यांनी 'सेफ हार्बर' नियमांचा आधार घेत जबाबदारी झटकू नये, असे सांगत त्यांनी 'प्लॅटफॉर्म जबाबदारी'वर भर दिला. मुळात हा विषय प्लॅटफॉर्मच्या जबाबदारीचा आहे. जिथे प्लॅटफॉर्म जबाबदारी स्वीकारत नाहीत, तिथे सरकारने हस्तक्षेप करणं आवश्यक आहे. भारतामध्ये २०२१ मधील नियमांनुसार पीडित व्यक्तींना नोडल अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्याची सुविधा आहे आणि ठराविक कालावधीत आक्षेपार्ह सामग्री हटविणे कंपन्यांना बंधनकारक आहे. तसेच एआय-निर्मित प्रतिमांवर 'वॉटरमार्क' सक्तीचे करण्याची गरजही त्यांनी यावेळी व्यक्त केली .युनायटेड नेशन्स इन्स्टिट्यूट फॉर ट्रेनिंग अँड रिसर्चच्या मिहोको कुमामोटो यांनी आपले विचार मांडताना क्षमता बांधणी आणि आंतरराष्ट्रीय सहकार्यावर भर दिला. यामुळे महिलांना एआय-आधारित जागतिक संधींचा लाभ घेता येईल. यामुळे महिलांचा सर्वांगीण विकास होईल असा विश्वास व्यक्त करुन त्या म्हणाल्या, युनीटारला भारत सरकार, राष्ट्रीय महिला आयोग, आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघ, तसेच इतर संयुक्त राष्ट्र भागीदारांसोबत व्यावहारिक समृध्दीसाठी एआय हे उदिष्ट ठेऊन पुढील कार्यक्रम अंमलात आणण्याची इच्छा आहे. हे कार्यक्रम स्थानिक वास्तवावर आधारित असतील, महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला बळ देतील आणि इतर देशांना उपयोगी पडेल असे पुराव्यावर आधारित मॉडेल उभारतील. म्हणूनच, जेव्हा ग्लोबल साउथमधील कृत्रिम बुद्धिमत्तेची कथा लिहिली जाईल, तेव्हा महिलांचा उल्लेख तळटीपेत न राहता, सामायिक आणि सर्वसमावेशक समृद्धीच्या मुख्य अध्यायाच्या लेखिका म्हणून त्यांची नोंद होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. इंटरनॅशनल टेलिकम्युनिकेशन युनियनच्या अत्सुको ओकुडा यांनी द्वितीय आणि तृतीय शहरांमधील महिलांसाठी डिजिटल समावेशकता वाढवण्याची आणि डिजिटल दरी कमी करण्याची गरज अधोरेखित केली. एआय नवसंशोधनाचे रूपांतर महिलांच्या प्रत्यक्ष आर्थिक सक्षमीकरणात करण्यासाठी एक 'प्रॅक्टिकल रोडमॅप' तयार करण्याबाबत भारताने पुढाकार घ्यावा असेही सांगितले. एआय संगीत निर्माते कार्तिक शाह यांनी सर्जनशील आणि डिजिटल अर्थव्यवस्थेत महिलांसाठी असलेल्या वाढत्या संधींबाबत यावेळी माहिती दिली. एआय मुळे कला क्षेत्रात होऊ शकणा-या बदलामुळे त्यांनी महिलांना या तंत्रामुळे पाठबळ लाभणार असल्याचे त्यांनी सांगितले. श्रीमती मिहोको कुमामोटो यांनी मॉडरेटर म्हणून सत्राची जबाबदारी साभाळली. सत्राच्या प्रारंभी महिला सक्षमीकरणाचा संदर्भ असलेली एआय वर आधारित चित्रफित दाखविण्यात आली. या सत्राचे संचालन सलोनी लखिया यांनी केले. श्रीमती आकांक्षा यांनी सहभागी वक्त्यांचा परिचय करुन दिला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १८ फेब्रुवारी २०२६


## जिंतूर ग्रामीण रुग्णालय रुग्णांची विशेष काळजी..! निशुल्क नेत्र तपासणी शिबिराला रुग्णांचा मोठा प्रतिसाद



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** येथील ग्रामीण रुग्णालय येथे वैद्यकीय अधीक्षक पदी डॉ मस्के हे रुजू झाल्यापासून विविध विभागाचे कर्मचारी व डॉक्टरमध्ये शिस्त रुग्णांना औषधी उपचार व सुविधा संबंधी स्वतः लक्ष देत असल्याने रुग्ण मात्र समाधान व्यक्त करीत आहे दि. 17 फेब्रुवारी रोजी समता फाउंडेशन जिल्हा रुग्णालय परभणी व ग्रामीण रुग्णालय जिंतूर यांच्या सहकार्याने निशुल्क नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन ग्रामीण रुग्णालय येथे करण्यात आले यासाठी वैद्यकीय अधीक्षक डॉ संजय मस्के व डॉ गजानन साळुंके यांनी रुग्णांची तपासणी केली तसेच टरमा केअर सेंटर या ठिकाणी डॉ. अन्सारी काम पाहत होते तर रुग्णालयात बाह्य रुग्ण तपासणीसाठी डॉक्टर भालेराव व महिला डॉ शेख सलमा, डॉ भायेकर, डॉ. अंकिता गौतम उपस्थिती होते यावेळी लसीकरण मोहीम सुरू असून गरोदर माता तपासणी साठी विशेष कक्ष उभारण्यात आले आहे यासाठी दत्ता काळे व प्राचारिका श्रीमती लता राठोड, श्रीमती छाया गायकवाड, ज्योती पाठोडे,राजश्री गंडप्पा, अश्विनी वाकडे, यांच्यासह सेवक व कर्मचारी उपस्थित होते ग्रामीण रुग्णालय येथे रुग्णांना योग्य औषधी उपचार मिळत असल्याने रुग्ण समाधान व्यक्त करीत आहे.

## शब्दांच्या बाजारात

शब्दांच्या बाजारात मांडले
विचारांचे रंगीत स्टॉल,
तोलामोलाने विकली तत्त्वं,
विवेक गेला डावलून दूर.

कागदावरच्या क्रांतींची
मोठी मोठी जाहिरात,
रस्त्यावरच्या जखमांना मात्र
नाही शब्दांत कुठलाही आसरा.

दु:खांवर परिसंवाद भरतो,
डोळ्यांत कृत्रिम ओल,
गरीबांच्या वेदनेलाच देतात
उपमांचा दिखाऊ खेळ.

जनतेच्या जिव्हाळ्याचे प्रश्न
राहतात कडेला सारून,
स्वतःच्या प्रतिमेभोवती
घेतात फेरे पुन्हा पुन्हा.

पण माती अजून जिवंत आहे,
घाम अजून देतो साक्ष,
खरे शब्द उगवतात तिथे
जिथे संघर्षाचा श्वास.

ना घोषणांचा गजर हवा,
ना दिखाव्याची शान,
माणसासाठी उभं राहणं
हाच खरा अभिमान.

जेव्हा शब्द हातात हात घेतील,
कृतीशी करतील मैत्री,
तेव्हा बदलतील फक्त विचारच
नव्हे तर,
बदलेल वाटांचीही नवी दिशा.

**प्रभाकर गायकवाड**
**छत्रपती संभाजीनगर**

## १० वी शालांत परीक्षेला जाताना घ्यावयाची काळजी आणि परीक्षेचे महत्व

विद्यार्थी मित्रांनो सर्वांना नमस्कार फेब्रुवारी/ मार्च २०२६ ची शालांत म्हणजेच महाराष्ट्र स्टेट बोर्ड ची इयत्ता १० वी ची परीक्षा काही दिवसांवर येऊन पोचलेली आहे. तुम्ही खूप चांगल्या प्रकारे आणि योग्य पद्धतीने शालेय स्तरावर शिक्षण घेऊन , अभ्यासक्रम पूर्ण, झालेला सराव, सोडवलेले पेपर्स याची सर्वांनी जय्यत तयारी केलेली आहे परीक्षेला जाताना सहजतेने आणि योग्य निर्णय घेत सामोरे जावे लागते कारण ही घटक चाचणी नसते तर ही तुमच्या जीवनाला, आयुष्याला कलाटणी देणारी परीक्षा असते भीती न बाळगता या परीक्षेला सामोरे जाताना काही गोष्टी लक्षात ठेवायला पाहिजे त्या खालील प्रमाणे आहे. १) विद्यार्थ्यांच्या जीवनातील १० वी पहिलीच म्हणजे सुरुवतीची आणि १२ वी आयुष्याला कलाटनी देणारी अति महत्त्वाची परीक्षा असते.२) तुम्ही केलेल्या अभ्यासाची उजळणी करावी , ५ ते ६ तरी नमुना उत्तर पत्रिका सोडवल्या असतील त्याचे वाचन आणि सराव करावा.३) परीक्षेच्या आदल्या दिवशी जास्त वेळ जागरण करू नये तसेच पुरेशी झोप घ्यावी.४) जे प्रश्न आतापर्यंत बोर्ड परीक्षेत आलेले आहेत त्याचा सराव करावा.५) नवीन प्रश्न नवीन पानावर सुरू करावा आणि शक्यतो खडातोड टाळावी. ६) परीक्षेच्या काळात आणि पेपरच्या दिवशी चिडचिड करू नका किंवा घरी भांडणे करू नये शक्यतो गाडी किंवा वाहन चालवू नये.७) परीक्षा केंद्रावर सकाळी १०:१५ वाजेपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करा कारण तो रिपोर्टिंग टाइम असतो. ८) मोबाईल, कॅल्क्युलेटर , स्मार्ट वॉच अशा इलेक्ट्रॉनिक वस्तू परिक्षेच्या काळात सोबत आणु नये.९) हॉलतिकिट, ओळखपत्र,आधार कार्ड सोबत ठेवावे.१०) उत्तर पत्रिका मिळाल्यानंतर बारकोड स्टिकरवर आपलाच बैठक क्रमांक आहे का तपासून घ्यावा.११) फॉर्म नंबर दोन वर आपला बैठक क्रमांक च्या पुढे सही करावी.१२) प्रश्नपत्रिकाचे किंवा कृतीपत्रिकचे पहिले पाच मिनिटे वाचन करून मगच उत्तर लिहिण्यास सुरुवात करावी.१३) प्रत्येक प्रश्न संपल्यानंतर रेषा मारावी कृती असेल तर आयत किंवा चौकोन करावा.१४) वेळेचे नियोजन लक्षात ठेवून शेवटी १० मिनिटे उत्तर पत्रिका तपासण्यासाठी ठेवावा.१५) पेपर संपल्यावर घरी जावे विनाकारण मुलांशी मुलींशी चर्चा करू नये वेळ वाया जातो.१६) उन्हाळ्याचे दिवस असल्याने सोबत पाण्याची बॉटल घ्यावी किंवा ग्लूकोज पाणी बॉटल मध्ये घेऊन ते सोबत ठेवावे. १७) तुमचा शालेय स्तरावर / कॉलेजच्या स्तरावर खूप सराव झालेला असतो त्यामुळे तुम्हाला बोर्डचा पेपर देताना नवीन वाटणार नाही किंवा मनात भीती बाळगायची गरज नाही.१८) अक्षर स्वछ आणि सुंदर काढून पूर्ण पेपर वेळ नियोजन करून सोडवावा नंतर जास्तीचे प्रश्न सोडवावेत.१९) भयमुक्त, आनंददायी परीक्षा द्यावी.२०) गणिताच्या बाबतीत सोडवलेली उदाहरणे सोडवावेत आणि त्याचा सराव करावा.विज्ञान आणि भूगोल या विषयाच्या संदर्भात आकृत्या ,नकाशे आणि आलेख अचूक काढावे.२१) सोबत २ ते ३ बॉल पेन न्यावेत. कंपास रोज सोबत ठेवावा.२२) बऱ्याच ठिकाणी १० वी किंवा १२ वी च्या गुणाणवर जागा निघतात किंवा अनेक कोर्स असतात ते लक्ष समोर ठेवून अभ्यास करावा.विद्यार्थी मित्रानो जर आपणास गणित विषयाची पूर्ण तयारी करावयाची असल्यास nilesh kankal math basic या यूट्यूब चॅनेला भेट द्या आपणास योग्य असे गणिताचे सेमी, मराठीत व्हिडिओ उपलब्ध आहे.सर्व पालकानी परीक्षेच्या काळात आपल्या पाल्याची शारीरिक व मानसिक काळजी घ्यावी तसेच सर्व प्रविष्ठ विद्यार्थ्यांनी कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा द्यावी.. सर्व विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी हार्दिक शुभेच्छा.




**निलेश मनोहरराव कंकाळ (Msc BEd Math) माध्यमिक शिक्षक तसेच नियामक (गणित भाग २) एस एस सी बोर्ड संभाजीनगर, सदस्य महाराष्ट्र गणित अध्यापक मंडळ छत्र.संभाजीनगर शाळा सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गोषेगाव तालुका भोकरदन जिल्हा जालना.**

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १८ फेब्रुवारी २०२६

# प्रगतीचा आरसा की प्रश्नांची जखम?




**मा**णसाच्या उत्क्रांतीची गोष्ट' — आत्मपरीक्षण घडवणारा कवितासंग्रह महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या नवलेखक अनुदान योजनेतून प्रकाशित झालेले कन्नड तालुक्याचे भूमिपुत्र श्री समाधान नानाराव निकम सहशिक्षक राजमाता जिजाबाई प्राथमिक शाळा राजनगाव जिल्हा छत्रपती संभाजी नगर यांचे हे पुस्तक पायगुण प्रकाशन अमरावती यांनी प्रकाशित केले असून मुखपृष्ठ शशी ग्राफिक अमरावती व मुद्रक राजेश बहाळे अमरावती हे आहे.माणसाच्या उत्क्रांतीची गोष्ट वाचताना वाचक एखाद्या कवितासंग्रहात प्रवेश करत नाही, तर तो माणसाच्या इतिहास, वर्तमान आणि भविष्य यांच्या मधोमध उभा राहतो. कवी समाधान निकम यांनी माणसाच्या उत्क्रांतीकडे विजयगाथा म्हणून पाहिलेले नाही; उलट ती एक अपूर्ण, प्रश्नांनी भरलेली आणि अस्वस्थ करणारी प्रक्रिया म्हणून त्यांनी मांडली आहे.आदिमानवाच्या हातातील दगडापासून ते आजच्या डिजिटल युगापर्यंतचा प्रवास कवी अत्यंत सहजतेने उलगडतो. मात्र हा प्रवास गौरवाचा नसून आत्मपरीक्षणाचा आहे.“हातात दगड होता तेव्हा भूक मारली,हातात सत्ता आली आणि माणूसच मारला.”या ओळी साधनांच्या बदलासोबत माणसाच्या हिंसक वृत्तीची धार कशी अधिक तीव्र होत गेली, हे ठळकपणे अधोरेखित करतात. उत्क्रांती म्हणजे संवेदनशीलतेचा विकास असायला हवा, पण इथे त्याच्या उलट घडल्याची खंत कवी व्यक्त करतो.या संग्रहातील देव, धर्म आणि श्रद्धेवरच्या कविता विशेष लक्ष वेधून घेतात. कवी श्रद्धेला नाकारत नाही, मात्र अंधश्रद्धेवर निर्भीडपणे प्रहार करतो.“देव शोधत राहिलो दगडात, मूर्तीत,माणूस मात्र हरवला गर्दीत.”या ओळी वाचताना जाणवतं की देवाच्या शोधात माणूस स्वतःतील माणूसपणच विसरत चालला आहे. देवाच्या नावावर चाललेली माणसामाणसातील लढाई कवी शांत, पण धारदार शब्दांत उघडी पाडतो.आई, स्त्री आणि कुटुंब या विषयांवरच्या कविता संग्रहाला भावनिक खोली देतात. इथे भावनांचा अतिरेक नाही, मात्र वास्तवाची तीव्र धार आहे.“आई थकली तरी तक्रार नाही,तिचं मौनच तिचं सगळ्यात मोठं दुःख आहे.”या ओळी स्त्रीच्या आयुष्यावरील शतकानुशतके चालत आलेल्या सहनशीलतेची वेदनादायी कथा सांगतात. आई रडत नाही म्हणजे ती सुखी आहे, हा समाजाचा गैरसमज कवी ठामपणे मोडून काढतो.शेतकरी, श्रम आणि निसर्ग यांवर लिहिताना कवी अधिक वास्तववादी आणि बोचरा होतो.“माती राबली म्हणून पिकं आली,माणूस राबला म्हणून मात्र त्याला किंमत नाही.”या ओळी ग्रामीण वास्तवाची वेदना थेट मांडतात. श्रमाची पूजा शब्दांत होते, पण श्रमिकाच्या आयुष्याला मात्र किंमत दिली जात नाही—ही विसंगती कवी स्पष्टपणे दाखवतो.निसर्गाविषयी कवीचा रोख अत्यंत परखड आहे.“झाडं तोडून प्रगती म्हणालो,सावली गेल्यावर उन्हाला दोष दिला.”ही कविता आजच्या विकासाच्या संकल्पनेवर गंभीर प्रश्नचिन्ह उभी करते. निसर्गाशी संघर्ष करून माणूस जिंकू शकतो, हा गैरसमज कवी प्रभावीपणे उधळून लावतो.संपूर्ण संग्रहाची भाषा साधी, बोलकी आणि प्रामाणिक आहे. कुठेही कृत्रिम बौद्धिकपणा जाणवत नाही. मुक्तछंदातील कविता असूनही त्यामध्ये अंतर्गत शिस्त आहे. प्रत्येक कविता स्वतंत्र असली, तरी त्यांना जोडणारा समान धागा म्हणजे—माणूस आणि त्याचं हळूहळू हरवत चाललेलं माणूसपण.शीर्षक कविता 'माणसाच्या उत्क्रांतीची गोष्ट' हा या संग्रहाचा केंद्रबिंदू ठरते.“माणूस पुढे गेला म्हणतात,पण मागे काय सोडून आला याचा हिशेब कुणी केला नाही.”या ओळींतून कवी उत्क्रांतीचा मूलभूत प्रश्न उपस्थित करतो. प्रगतीच्या नावाखाली माणूस संवेदना, नाती, करुणा आणि निसर्ग मागे टाकत चालला आहे, ही जाणीव ठळकपणे समोर येते.हा कवितासंग्रह वाचकाला आनंद देण्यासाठी नाही, तर अस्वस्थ करण्यासाठी आहे—आणि हीच अस्वस्थता त्याची खरी ताकद आहे. पुस्तक बंद झाल्यानंतरही या कविता मनात घोळत राहतात, विचार करायला भाग पाडतात आणि स्वतःकडे पाहायला लावतात.माणसाच्या उत्क्रांतीची गोष्ट हा कवितासंग्रह म्हणजे एक आरसा आहे. त्या आरशात दिसणारं प्रतिबिंब कदाचित सुंदर नसेल, पण ते खरं आहे. आणि म्हणूनच हा संग्रह महत्त्वाचा ठरतो. मराठी कवितेतील विचारशील, सामाजिक आणि आत्मपरीक्षणात्मक परंपरेला हा संग्रह निश्चितच बळ देतो.

पुस्तक नाव - माणसाच्या उत्क्रांतीची गोष्ट



**कवी - समाधान निकम**
**प्रकाशक - संध्या राजेश बहाळे**
**पृष्ठसंख्या — ९२**
**मुल्य — ४८**
**समीक्षा लेखन संदीप नानासाहेब वाकडे**
**रा. खेडा ता.कन्नड 9766992776**

# छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळातील जलसंवर्धन कार्य



**छ**त्रपती शिवाजी महाराज यांची ओळख स्वराज्य निर्माता म्हणून जितकी आहे तितकीच रयतेचा राजा म्हणून देखील आहे. आपल्या स्वराज्यात असणारी प्रजा ही सर्वाधिक महत्वाची आहे.. त्यांच्या समस्या सोडवणे याला प्राधान्य असले पाहिजे याबाबत ते आग्रही होते.राजांची ओळख कुशल प्रशासक म्हणून देखील आहे. यासोबतच रयतेचा राजा म्हणून त्यांनी शेतकरी आणि शेतीवर अवलंबून असलेल्या रयतेसाठी असणारे पाण्याचं महत्व जाणलं आणि यासाठी त्यांनी जलसंवर्धन कार्याला वेगळे आयाम दिले. त्यांचे याबाबतीत असलेला अभ्यास आणि धोरणीपणा आजच तितकाच मोलाचा ठरतो.आपला देश हा मौसमी हवामान क्षेत्रात आहे. कधी दुष्काळ तर कधी अतिवृष्टी नवी नाही. त्याकाळी आणि आजही शेती पावसावरच अवलंबून आहे. त्यामुळेच त्यांचे या क्षेत्रात असणारे योगदान आजही मार्गदर्शक असे आहे.छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यकारभारात जलव्यवस्थापनाला अत्यंत महत्त्वाचे स्थान होते. पाणी ही केवळ जीवनावश्यक गरज नसून शेती, लोककल्याण आणि किल्ल्यांची सुरक्षा यासाठीही ते तितकेच आवश्यक आहे, याची महाराजांना पूर्ण जाणीव होती. त्यामुळे त्यांच्या काळात जलसंवर्धन, पाणी साठवण आणि योग्य वापर यावर विशेष भर देण्यात आला.भौगोलिक परिस्थितीची जाणमहाराष्ट्राचा मोठा भाग डोंगराळ व पावसावर अवलंबून आहे. विशेषतः सह्याद्री पर्वतरांगांमध्ये पाण्याचे स्रोत ऋतुनिष्ठ असतात. ही परिस्थिती ओळखून शिवाजी महाराजांनी पावसाचे पाणी अडवणे आणि साठवणे यावर भर दिला.किल्ल्यांवरील जलव्यवस्थाशिवकालीन किल्ले ही जलसंवर्धनाची उत्कृष्ट उदाहरणे मानली जातात. रायगड किल्ला, राजगड किल्ला यांसारख्या किल्ल्यांवर:-दगडात कोरलेली टाकी (पाण्याची टाकी) बांधण्यात येत- पावसाचे पाणी साठवण्यासाठी तलाव तयार केले जात-झऱ्यांचे पाणी सुरक्षित मार्गाने टाक्यांमध्ये आणले जात- किल्ल्यावर वर्षभर पुरेल इतका पाणीसाठा राखला जाई यामुळे दीर्घकालीन वेढ्यातही किल्ले टिकून राहत.लोकाभिमुख धोरणशिवाजी महाराजांच्या प्रशासनात प्रजेच्या गरजांना प्राधान्य होते. गावागावांत विहिरी, तलाव, बंधारे बांधण्यास प्रोत्साहन दिले जाई. शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध राहावे यासाठी लहान सिंचन व्यवस्थाही उभारल्या गेल्या आणि त्यामुळे गावागावात पाण्याची उपलब्धता सातत्यपूर्ण होती ज्यामुळे जीवनाला स्थर्य प्राप्त होऊ शकले. गावालगत असणाऱ्या मंदिरालगत असणाऱ्या विहिरी आणि बारव आपण आज ही अस्तित्वात आहेत असे बघतो.पर्यावरणपूरक दृष्टीकोनजलस्रोतांचे संरक्षण करण्यासाठी जंगलांचे महत्त्व त्यांनी ओळखले होते. डोंगरउतारांवरील झाडी राखल्याने पाणी धरून ठेवण्यास मदत होते, याची जाण त्या काळातही होती. त्यामुळे नैसर्गिक संसाधनांचा समतोल राखण्याची परंपरा दिसून येते.छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील जलसंवर्धन कार्य हे दूरदृष्टी, शास्त्रीय विचार आणि स्थानिक भौगोलिक जाण यांचे सुंदर मिश्रण होते. आजच्या जलसंकटाच्या पार्श्वभूमीवर शिवकालीन पाणी व्यवस्थापन आपल्याला शाश्वत जलवापराचा मौल्यवान धडा देते. त्यांच्या कार्यपद्धतीतून प्रेरणा घेऊन आधुनिक काळातही जलसंवर्धन अधिक प्रभावीपणे राबवता येऊ शकते.


**भगवंत पाळवदे**
**(बीड जिल्हा प्रतिनिधी)**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १८ फेब्रुवारी २०२६

# शब्दांची नितळ श्रेध्देय खळखळ : केसर दिव्यांची माळ




**ख्या**तनाम कवीवर्य सतीश सोळांकुरकर यांच्या शिद्हस्त लेखणीतून अतिशय भावतरल ललितबंध मनाशी मनाच्या कप्प्यात साठवून ठेवाव्यात अशा आठवांचा हा अनुबंध आहे.शब्दांवर नितांत प्रेम झाल्यावर ते असे व्यक्त करावे.जी ऋणानुबंधाच्या प्रेमळ गाठीभेटी होतील.'आंधळ्याच्या गाई परमेश्वर राखतो' मनाचा एक हळवा कोपरा सतू जपून ठेवतो.आईने दिलेले संस्कार.शालेय जीवनातील अतिशय अमिट अनुभव जो संवेदनात्मक आहे.दिवस रहात नाहीतगरीबी असली म्हणून काय झालं?सतूला मित्रांनी चादर वघोंगडीची दिलेली अनोखी भेट डोळे पानावून टाकते.ही मनोज्ञ अप्रतिम भावना.आई ही एक ईश्वरीय देणं आहे.ज्या आईच्या कुशीत लहानपण गेले.ती आई किती सोशिक, समजस उद्याचा उषःकाल हातात देते.' आई आणि डॉ.ही एक मनस्वी गोष्ट.मनाला हळूवार करून जाते.आईचं खरंच काही दुःखतं नाही.पण आपल्या लेकरा विषयी कुणी 'पोटाचा गेलं मोठा झालय जरा आवरा' यावर आई काळीज कळवळून बोलते..डोळे पानाऊन जातात.'ऐरणीच्या देवा' हे कवी जगदिश खेबुडकरांचे गीत.या गीत काव्याची महती जेव्हा खुद्द कवी ग्रेस सोळांकुरकरांना सांगतात.हा शब्दांचा मोठेपणा एक प्रचंड सृजनशील कवी ग्रेसांनी केलेली तारिफ.कवी खेबुकर ऐकतात.धन्य होतात.गीतकार म्हणून जो शिक्का आहे.तो कवी म्हणून मनावर गिरवतांना.कवीला गहिवरून येते.'धागा केसरी झाला' कवी श्रेष्ठ शंकर वैद्य.एका आवडत्या मोठ्या कवीच्या सहवास.हाॅटेल सुदर्शन.लेखक व मित्रअनिल.'ते चार दिवस म्हणजे स्वर्ग सुख', अखिल भारतीय कवी संमेलनाचे सुत्रसंचलनाची संधी म्हणजे बहार.कवी प्रवीण दवणे.अध्यक्ष.हा ललितबंध म्हणजे आत्मिक स्वानंदाची दरवळ.म्हणून फुलांनी माळेत ओवल्यावर केसरी रंग व्हावा.इतकं मन मोहरुन येणं.हे सद्भाग्य सतीश सोळांकुरकर यांनी अनुभवलं आहे.'कशी वाटली?'एकदा डान्सिंग स्पर्धेसाठी परिक्षक म्हणून गेल्यावर.स्पर्धा सुरू होते.तिथे तांब्या भरून ठेवतात.जो तो उठतो घेतो.स्पर्धा संपते निकाल लावल्या जाते.योग्य ती निवड होते.नंबर काढले जातात.कशी वाटली? त्यांना कळत नाही.तुम्ही होते म्हणून निकाल चांगला दिला.नाहीतर परिक्षकालाच मारले असते.त्यांना कळतं नाही.दुसऱ्या ठिकाणी गेल्यावर तिचं अवस्था.तिथं मात्र तांब्यात दिलेली गावरान दारू मित्र पितो आणि म्हणतो "कशी काय वाटली.असा सुंदर ललितबंध.कवी कलावंताची कलेवरची निष्ठा आणि श्रद्धा यातून दिसून येते."जरा थांबला असता तर "लग्नबंधनाची गोष्ट.नोकरी आहे,पण घर नाही,एक वकील आपल्या मुलीचे स्थळ घेऊन येतो.मुलीला मुलगा पसंत पडतो.पण बाप नाही म्हणतो.पुढे अनेक मुलीने नकार दिलेला असतो.पुढे ज्या दिवशी हळद लागते त्याचं दिवशी ज्यांनी नकार दिला होता तेच येतात.इथे हळद मंडूळी बांधलेला नवरदेवचं दिसतो.ते गपगुमान जातात.ज्या मुलीने पसंत केले होते.पुढे पुजेच्या वेळेस पत्नी म्हणते.'जरा थांबला असता तर' हा मनस्वी मनाचा अनुबंध लेखक मांडून जातात.आजोळी गारगोटी.काॅलेजच्या हाॅस्टेलवर जिव्हाळ्याची मित्र.नाॅनव्हेज असेल त्या दिवशी सतिशला लिंबू,कांदा घेऊन ये..वर्गातचं चिठ्ठीवर लिहून दिल्या जाई.चपाती किंवा भाकरी घेऊन येणारा सतिश.संध्याकाळी ताटातं पालीचं पिल्लू निघते.पाल अत्यंत विषारी.आपण सारेचं आता मरू.म्हणून झोपून राहतात.सतिश सकाळी येतो.सारेचं झोपलेले.टेबलवर चिठ्ठी सापडते.'यातील कुणालाच जबाबदार धरू नये'.कवीवर्य जेंव्हा ललित लिहितो ती प्रत्येक गोष्ट कविता असते.या ललितलेखनात विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षण काळातील ते पुढे साहित्य विश्वात एक सृजनशील शब्दांची निस्सीम भक्ती करणारे शिद्हस्त मनोगत आले आहे.कवी सतीश सोळांकूरकर लिहितात "ती जेव्हा लिहिते, जेव्हा व्यक्त होते तेंव्हा युगानुयुगांच्या कोंडलेल्या अंधाराला ती उजेडाची दिशा दाखवत असते.ती जेव्हा लिहिते तेव्हा आत उकळत असलेल्या ज्वालामुखीच्या रसाला ती कागदावर उतरवत असते.ती जेव्हा लिहिते तेव्हा मातीच्या आत अंकुरत असलेल्या बीजाला ती आकाशच्या हवाली करत असते.आणि म्हणूनच तिचे व्यक्त होणे,तिचे लिहिणे,तिचे शब्दबद्ध होतं जाणे ही साधी गोष्ट असतं नाही.तिच्या प्रत्येक शब्दासाठी तिने आपल्या असण्याचे दान दिलेले असते.प्रत्येक शब्दांसाठी जगण्याचे भान दिलेले असते आणि म्हणूनच तिचे लिहिणे ही काही सहज गोष्ट असतं नाही "(मलपृष्ठ)या ललित लेखसंग्रहाची एक सृजनशील ललाना आहे ती कवी कलावंतांचे मन घेऊन सुंदर फुलपाखरू होऊन या ललितभर मन वेल्हाळ गोष्ट देऊन जाते. हे या ललितलेखनाचे श्रेयस आहे.ज्याच्या खिशात एक ही पैसा नाही पण त्यांने शब्दांनी मनमोहित करणारी माणसं कमवली.कवितेने हे मनाचे हिरवे पाचूबंध घेऊन सृजनशील मुक्त व्यक्त होत.काही कचाट्यातल्या अनुभूतीला मनस्वीपणाची मायाळू सावली मिळून जाते. ती लिहिते तेव्हा हा ललित अनुबंध म्हणजे एका सृजनशील भाव व्याकुळ कवीची प्रतिभा आहे.तर तुम्ही खूप सुंदर अहात हा अनुभव वयाच्या कोवळी लाल गुलाबी पिंपळ पानावराच्या मदहोश अनुभूतीचा ललितानुबंध आहे.ती चादर तू घेऊ नकोस.शालेय जीवन संघर्ष,अतिशय गरीबी त्यातही आपल्या दारिद्याचे पोरकेपण दिसू नये म्हणून गरीबी असली म्हणून काय झालं.तीचं प्रदर्शन नकोय.हा बालपणीच्या संस्कारांचा अनमोल ठेवा शिदोरीगत लेखकांने तरलतेने मांडला आहे.पत्रास कारण की..वाले, कुणाच्या तरी सांगण्यावरून कवीवर विनयभंगाची तक्रार केली.पण खरंच कवी भाग्यवंत असतो.'पहिलटकरीण'ही कविता ठाणेदारालाचं खूप आवडते.तिथे कवीची ओळख निर्लेप नितळ अशी ठरते.आपला पत्रास कारण की, कवितासंग्रह खूपच लोकप्रिय आहे.याची प्रचिती येते."अजामीनपात्र गुन्ह्यांसाठी मला तुरुंगात जावे लागले असते.माझी नोकरी गेली असती आणि मला जबर शिक्षाही झाली असती.या कवितेने मला सांभाळून घेतले.या कवितेचा नाद असा गा लागला कैवार घेतला तिने माझा (पृष्ठ ६०)मनीऑर्डर या ललितलेख मनाचा गहिवर ओथंबून आणतो."तू आजवर इतरांना मनीऑर्डर वाटत आलास.अनवानी पायाने पत्रं पोहोचवत आलास.आज ही तुझी मनीऑर्डर समज..असे म्हणताचं त्यांने मला गच्च मिठी मारली.सगळ्या गावाला मनीऑर्डर वाटणाऱ्या म्हादू पोस्टमनच्या डोळ्यात मनीऑर्डरची पोचपावती मला स्पष्ट दिसत राहिली.(पृष्ठ ६५)या तरल अनुभूती या ललितगंधात आहे.'लालपरी'त्याकाळी किती महत्वाची होती प्रवासाठी.प्रियेशीने आपल्या प्रियकराला ललापरीच्या पाठीमागील काचावर धुळीमध्ये गिरवलेले ओळ "मी बरी आहे.तू काळजी घे"(पृष्ठ ७८,) किंवा "पहिल्यांदा सासरी जात असलेल्या मुलीच्या अश्रूंना आपल्या पदरात घेणारी ही लालपरी.हा अतिशय सृजनशील स्नेहाळू अनुबंध या ललितलेखनाचे वैशिष्ट्य आहे.कवी ग्रेस यांच्या भेटीचा प्रसंग साक्षात परब्रह्म तस्मै नमः या युक्ती प्रमाणे येतो.कवयित्री डॉ शोभा रोकडे सोबत दिनानाथ हॉस्पिटल, पुणे) सतीश,ते पहा केमोथेरपी मुळे देह काळाअंगठा मात्र शुभ्रधवल.देहाच्या कमानीवर निरंजन उजळते असे वाटत होते.कृष्ण निजधामाला जाण्यापूर्वी असाच पायावर पाय घेऊन पहुडला होता.व्याधाला कृष्णाचा अंगठा मृगनेत्रासारखा भासला.त्यांने बाण सोडला आणि हेच श्रीकृष्णाच्या निजधामाला जाण्याचे कारण झाले.(पृष्ठ ७४)शोभा रोकडे म्हणाली बाण सुटला आहे.आता सर जातील.हा मृत्यूचा प्रसंग साक्षात अनुभवणारे हे कवीस्नेही मनाच्या स्मरणपटलावर आठवणीची मोर पिसे हळूवार हाळवे करून जातात.मानधन कोणाकडून घेयाचे?लालपरी, विष्णू झोपलाय, आरटीआय करतं असताना घरून पैसे आले नाही उपाशी राहून दिवस काढावे लागले.हा अनुभव मन चिरुन टाकतो.वेडापीर, कवीवर्य ग्रेसचा भंगना जगण्याची अनुभूती त्यांचा मित्र हरिश भगवते सांगितलेली.सात्याचा नवस हा अनुभव एकदातरी विठ्ठलाची वारी अनुभवावी.शालेय जीवनातले मित्र.त्या वारीचे नियम प्रभात काळी उठून अभ्यंगस्नान करून ही मंडळी अतिशय श्रद्धेने विठ्ठल भक्तीत तल्लीन होतात.हा अनुभव म्हणजे साक्षात केलेली वारी.मित्र सात्याचा नवस नोकरी लागली पाहिजे.म्हणून अखंड वारी करणारा मित्र..संदेश ढगे, सौमित्र (किशोर कदम) मंगेश पाडगावकर, जगदिश खेबुडकर,अशोक बागवे, नारायण लाळे, यांच्यासह अनेक मान्यवर कवीचा स्नेहाळू भाव या ललित लेखनात आला आहे.अखिल भारतीय कवी संमेलनात सुत्रसंचलन करण्याचा सन्मान मिळालेला आहे.एकूनचही 'केसर दिव्यांची माळ'म्हणजे शब्दगंध फुलांची मनस्वी गुंफण आहे.

**केसर दिव्यांची माळ:-सतिश सोळांकुकर**
**ललित लेखसंग्रह**
**प्रकाशक:-संजय शिंदे अष्टगंध प्रकाशन, ठाणे**
**आवृत्ती पहिली:-मार्च २०२४**
**मुखपृष्ठ:-सतिश भावसार.**
**मूल्य:-१७० रुपये**
**पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके, जालना**
**संवाद:-९९७५१३७३३७**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002
महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002
एम.जे. न्युज चॅनल

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १८ फेब्रुवारी २०२६


## “बायको-मुलांपेक्षा तुम्हीच प्रिय”; माजी सरपंचाचा ग्रामसेविकेशी वादग्रस्त प्रकार

**अहिल्यानगर :** तुम्ही खूप छान दिसता, तुम्ही इथे आल्यापासून मला खूप आवडतात. मी तुमच्यावर खूप प्रेम करतो. माझ्या बायको मुलापेक्षा तुम्ही मला जास्त आवडतात, असे म्हणत हात धरल्याचा प्रकार अहिल्यानगरच्या कोपरगाव तालुक्यातील एका गावात घडला आहे. माजी सरपंच अशोक विठ्ठल भोकरे यांनी तालुक्यातील एका ग्रामपंचायतीत शासकीय सेवेत असलेल्या महिलेचा विनयभंग केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी १४ फेब्रुवारी रोजी कोपरगाव तालुका पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

महिलेच्या तक्रारीनुसार, माजी सरपंच भोकरे दीड ते दोन वर्षांपासून मला वारंवार फोन करून तुम्ही आज छन साडी घातली. खूप छान दिसतात. कधीकधी तुम्ही खूप सुकलेल्या दिसतात. आज खूप टेंशन आहे का? मी येऊ का टेंशन दूर करायला म्हणून माझ्या मनाला लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करत असून सदर इसमा विरुद्ध माझी तक्रार आहे असे म्हणत कोपरगाव तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.


कोपरगाव तालुक्यातील माजी सरपंच अशोक विठ्ठल भोकरे यांच्यावर विनयभंगाचा गुन्हा दाखल होऊनही त्यांना अद्याप अटक न झाल्याने, ग्रामपंचायत अधिकारी संघटनेच्या वतीने पोलिस निरीक्षक संदीप कोळी यांना निवेदन देऊन आरोपीला दोन दिवसांत अटक करण्याची मागणी करण्यात आली आहे. पीडित महिलेने दिलेल्या फिर्यादीनंतरही पोलिस कारवाईत विलंब होत असल्याचा आरोप करत, संघटनेने या प्रकरणी तातडीने पावले उचलण्याची आग्रही विनंती प्रशासनाकडे केली आहे.

या प्रकरणात आरोपीला दोन दिवसांत अटक न झाल्यास 'काम बंद' आंदोलन करण्याचा आक्रमक इशारा ग्रामपंचायत अधिकारी संघटनेने निवेदनाद्वारे पोलिसांना दिला असून, या पवित्र्यामुळे आता पोलिस प्रशासन काय भूमिका घेते आणि संबंधित आरोपीच्या मुसक्या कधी आवळल्या जातात, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# शैक्षणिक सुसंवाद

जागतीक महासत्ता होण्यासाठी कोणत्याही देशाला आधुनिक तंत्रज्ञानाची विशेष गरज भासते व आधुनिक तंत्रज्ञानाचा वारसा निर्माण करण्यासाठी गरज आहे ती शिक्षणाची. शिक्षण हे देशाच्या विकासाचा पाया होय जर शिक्षणक्षेत्रात विकास होत असेल तर देश विकसनशील म्हणून संबोधला जातो.

जर आपल्या भारताला विकसीत करायचे असेल तर आजच्या शिक्षणप्रणालीत अमुलाग्र बदल आवश्यक आहे आजही जर आपण आपल्या देशाच्या शिक्षणाकडे बारकाई पाहीले तर आपणास आजला खूप उणिवा दिसतील, जापान, चीन, अमेरीका, फिनलैंड सारख्या देशाचे शिक्षण पाहीले तर लहानपणापासुन विद्यामध्ये संतज्ञान व देशसेवा विषयी आवड निर्माण केलाई जाते. व एकीकडे भारतीय शिक्षणप्रणाली ही खूप मागे असल्याचे दिसून येत आहे आजही आपण विज्ञानाचा वापर फक्त २८ फेब्रुवारी आली की विज्ञान दिवस म्हणून साजरा करुन विज्ञानाला पुस्तकी ज्ञान म्हणून विसरून जातो, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये आजही जगातील सर्वात महत्त्वाचे विषय समजल्या जाणाया इंग्रजी, गणित व विज्ञान या विषयाची भीती जानवत आहे. याच एकमेव कारण म्हणजे या विषयाबाबत अज्ञानता. जर या विषयाबाबत भीती दूर करायची असेल तर विद्यार्थी-शिक्षक-पालक या मध्ये सुसंवाद वाढणे अपेक्षित आहे परंतु याबाबतही ग्रामीण भागात उदासीनता दिसून येते. पालकसभा आयोजीत केल्यावरही 100% मधून २ % ते 3% पालकच. सभेला उपस्थित राहलात व काहीच कारण नसतांना पालक सभेला उपस्थित राहत् नाही व त्यामुळे विद्यार्थी-शिक्षक व पालक यामध्ये चचर्चा होत नाही व शिक्षक विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्यात असमर्थ ठरतो व विदयाध्यानमध्ये एक अशी भावना . निमाण होत असल्याचे दिसून येत आहे की आमच्याकडे कोणाचेच लक्ष नाही म्हणून ते वेगळ्या मार्गला लागतात अभ्यासाच्या नावाखाली मोबाईल वर जास्त वेळ वाया घालवणे व मोबाईल वरील गोष्टीला सत्य मानून त्याचं अवलोकन करणे हे वाढत जात आहे जर समाजातील हे घटक दूर करायचे असतील तर विद्यार्थ्यांना लहान वयापासूनच कृतीतून शिक्षण देणे गरजेचे आहे प्राथमिक शिक्षणाचा पाया असताना रोबोटिक सायन्स,इलेक्ट्रॉनिक्स,शेती तंत्रज्ञान, संगणकशास्त्र, देशसेवा, स्पेस सायन्स, विविध खेळ, पर्यावरणाशी नाते यांचा अभ्यास प्रात्यक्षिकातून देणे अनिवार्य करण्यात यावे जेणेकरून विद्यार्थ्यांचा कल लहानपणापासूनच या सर्व क्षेत्रांमध्ये राहील व याद्वारे विद्यार्थ्यांचा पाया मजबूत होईल व त्यांना स्वतःची दिशा निवडताना काहीच अडचण निर्माण होणार नाही व याद्वारे विकासाला चालना मिळेल व भारत महासत्ता बनण्यास कोणतीच अडचण निर्माण होणार नाही.




**पठाण इफरोज शौकत**
(सहशिक्षक उच्च माध्यमिक)
सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय
गोषेगाव तालुका भोकरदन,
जि. जालना
मो. +९१९६३७७९७७९५



डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

| | | |
|---|---|---|
| DMLT कालावधी २ वर्ष पात्रता : १० वी /१२ वी पास | SANITARY HEALTH INSPECATOR कालावधी १ वर्ष पात्रता : १०वी /१२ वी पास | PG RADIOLOGY कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर) पात्रता : Any B.Sc. |
| C.T.SCAN कालावधी १ वर्ष पात्रता : १० वी १२ वी पास | E.C.G. कालावधी १ वर्ष पात्रता : १० वी १२ वी पास | PGDMLT कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर) पात्रता : B.Sc (Microbiology, chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS) |
| X-RAY कालावधी १ वर्ष पात्रता : १०वी, १२ वी पास | रेडिओलॉजी कालावधी २ वर्ष पात्रता : १२ वी सायन्स पास | फिजिओथेरपी कालावधी २ वर्ष पात्रता : १२ वी सायन्स पास |
| ऑप्थोमेट्री कालावधी २ वर्ष पात्रता : १२ वी सायन्स पास | DIALYSIS TECHNICIAN कालावधी १ वर्ष पात्रता : १० वी / १२ वी पास | O.T.TECHINICIAN कालावधी २ वर्ष पात्रता : १० वी १२ वी पास |



ADMISSION OPEN

बीबीका मकबऱ्याच्या मागे,
हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा,
छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्पायरल व हार्ड बायडींग
- डेझर्टेशन
- कलर प्रिंट
- स्कॅनिंग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.टी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा..
अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |